ePaper

## बांगलादेशात दोन दशकांनंतर बीएनपीला सत्ता, तारिक नवे पंतप्रधान



| वर्ष - 9 । अंक - 170 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)


पान 2 वरुन...

उपमुख्यमंत्री, सुनेत्रा पवार यांचा 'जनसंवाद'


WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 15 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### मुलुंडच्या एलबीएस रोडवर भीषण अपघात;एकाचा मृत्यू, अनेकजण जखमी

# मुंबईत मेट्रो स्लॅब कोसळला..!

**महाईन्यूज । मुंबई**

**'वडाळा – ठाणे – कासारवडवली मेट्रो ४' मार्गिकेच्या कामादरम्यान मुलुंड येथे शनिवार दुपारी मेट्रोच्या खांबाचा काँक्रीट स्लॅब (पॅरापेट) उंचावरून खाली कोसळला. रस्त्यावरून जात असलेल्या एका रिक्षा आणि चारचाकी वाहनावर तो कोसळला. या दुर्घटनेत एकाचा जागीच मृत्यू झाला, तर तिघे जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे.**





मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) 'वडाळा – ठाणे – कासारवडवली मेट्रो ४' मार्गिकेचे काम हाती घेतले आहे. या कामादरम्यान मुलुंड येथील जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीसमोरील एल.बी.एस. रोडवर शनिवार दुपारी १२.२० च्या सुमारास मेट्रोच्या खांबाचा काँक्रीट स्लॅब कोसळला. रस्त्यावरून जात असलेली रिक्षा आणि मोटारीगाडीवर हा भाग कोसळल्याने तिघे जण जखमी झाले, तर एकाचा मृत्यू झाला.

जखमींना तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून जखमींपैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलासह एमएमआरडीएचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून मदतकार्य सुरू करण्यात आले आहे. एमएमआरडीएकडून दुर्घटनेची माहिती घेण्यात येत असून जखमींना आवश्यक ती सर्व वैद्यकीय मदत करण्यात येईल, असे सूत्रांनी सांगितले. या दुर्घटनेमुळे मेट्रोसह इतर पायाभूत कामांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित झाला आहे. कामादरम्यान आवश्यक ती खबरदारी का घेण्यात आली नाही, असा सवाल स्थानिक रहिवाशांकडून करण्यात येत आहे. तसेच जबाबदार अधिकारी आणि कंत्राटदारांविरोधात तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणीही करण्यात येत आहे.

या दुर्घटनेत रामधन यादव यांचा मृत्यू झाला आहे. राजकुमार इंद्रजित यादव (४५) हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपासनी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. महेंद्र प्रताप यादव (५२) आणि दीपा रुहिया (४०) यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

### मृतांच्या कुटुंबियांना पाच लाखाची मदत जाहीर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुलुंडमधील दुर्घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, मुंबईतील मुलुंड भागात मेट्रो बांधकामाचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून इतर काही जखमी झाले आहेत. या घटनेबद्दल चौकशीचे आदेश दिले आहेत. मृताच्या वारसांना 5 लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकार देईल आणि जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य सरकार करेल. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना.

### MMRDA कडून उच्चस्तरीय चौकशी समितीची स्थापना

भीषण दुर्घटनेनंतर एमएमआरडीए (MMRDA) ने दुसरे अधिकृत निवेदन जारी केले आहे. MMRDA च्या माहितीनुसार, या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचे नेतृत्व बसवराज एम. भद्रगोंड, संचालक, एमएमआरडीए (मेट्रो पी.आय.यू) हे करणार आहेत.MMRDA ने सांगितले की, मृतांच्या कुटुंबियांना एमएमआरडीएकडून आर्थिक मदत दिली जाईल. तसेच जखमींच्या उपचारांच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी एमएमआरडीए पूर्णपणे उचलेल, असेही प्राधिकरणाने स्पष्ट केले.

### यापुर्वी घडलेले अपघात

घोडबंदर मार्गावरील कापुरबावडी भागात सप्टेंबर २०२५ मध्ये दोन लोखंडी रॉड कारवर पडल्याचा प्रकार उघडकीस आला होता. मेट्रोच्या कामासाठी उन्नत मार्गावर ठेवलेले हे दोन रॉड वाहनावर पडले होते. हे रॉड कारच्या आरशावर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. तसेच कापूरबावडी भागात यापूर्वी अशा दोन घटना उघडकीस आल्या होत्या. ३० जुलैला तत्वज्ञान विद्यापीठ भागातून प्रवास करणाऱ्या वाहन चालकाच्या कारवर रॉड पडला. या घटनेत चालक थोडक्यात बचावला होता. २ मे या दिवशी एका कारवर मेट्रो कामासाठी बसविण्यात आलेल्या क्रेनचा भाग कोसळला. या घटनेतही चालक आणि त्याचे कुटुंबिय बचावले होते. भिवंडी येथेही ५ ऑगस्टला सोनू अली रमजान अली शेख (२२) या तरुणाच्या डोक्यात प्रवासा दरम्यान मेट्रो मार्गिकेसाठी लागणारी सळई डोक्यात शिरली होती. अशा घटना वारंवार घडत असल्याचे चित्र आहे.

# सुनेत्रा पवार यांचा ‘जनसंवाद’

## पुणे जिल्ह्यातील पक्षबांधणीसाठी सुनेत्रा पवार या सक्रिय

**महाईन्यूज । पुणे**

**राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची धुरा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपविण्यात येण्याची शक्यता असतानाच पुणे जिल्ह्यातील पक्षबांधणीसाठी सुनेत्रा पवार या सक्रिय झाल्या आहेत. जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या सदस्यांशी संवाद साधल्यानंतर आता त्या अजित पवार यांच्याप्रमाणे ‘जनसंवाद ’ साधणार आहेत.**



### जनसंवादाचे नियोजन

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ‘जनसंवाद’ उपक्रम सुरू केला होता. पुण्यातून या उपक्रमाला सुरुवात करून नागरिकांशी संवाद साधला. आगामी काळात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या पक्ष कार्यात सक्रिय होणार आहेत. त्यादृष्टीने ‘जनसंवाद’साठी ‘राष्ट्रवादी’ने तयारी सुरू केली.

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर ‘राष्ट्रवादी’त दु:खाचे वातावरण असताना पुणे जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत अजित पवारांच्या ‘राष्ट्रवादी’ला भरघोस यश मिळाले. जिल्हा परिषदेत ७३ जागांपैकी ५१ जागा घेत ‘राष्ट्रवादी’ने सत्ता कायम राखली. या निवडणुकांमध्ये प्रचार न करतानाही ‘राष्ट्रवादी’ला सहानुभूती मिळाली. त्यामुळे ‘राष्ट्रवादी’ने सत्ता काबीज केली. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर आता त्यांनी जिल्ह्यातील पक्ष कामकाजाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. जुन्नर, खेड, आंबेगाव आणि मावळ तालुक्यांतील पक्षाच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांनी शुक्रवारी त्यांची भेट घेतली. त्या वेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांबरोबर विविध विषयांवर चर्चा केली. त्यामध्ये येत्या काही दिवसांमध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांसह विषय समिती सदस्यांची निवड होणार आहे. त्या बाबतीतही सुनेत्रा पवार यांनी संवाद साधला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाहिलेले विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी साथ देण्याचे आवाहन त्यांनी केले. अजित पवार यांचे पुणे जिल्हा हे कार्यक्षेत्र असल्याने त्यांनी पालकमंत्री या भूमिकेतून जनसंवादातून थेट नागरिकांचे प्रश्न सोडविण्यावर भर दिला. या जनसंवादातून राज्यभरातील लाडक्या बहिणींबरोबरच लाडके भाऊ खुश आहेत की नाराज, याचा अंदाज त्यांनी घेतला. या जनसंवादातून लोकांचे पक्षाविषयक अभिप्रायही त्यांनी जाणून घेतले. तसेच नागरिकांच्या तक्रारींचे जागेवरच निवारण केले. त्यांनी ‘जनसंवादा’ला १३ सप्टेंबर २०२५ पासून पुण्यातील हडपसर विधानसभा मतदारसंघापासून आरंभ केला. त्यामध्ये पवार यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेवून अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रश्न मार्गी लावले. त्यामुळे जनसंवादाला भरघोस प्रतिसाद लाभला. आता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यादेखील जनसंवाद उपक्रम सुरू करणार असल्याचे ‘राष्ट्रवादी’च्या पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. या जनसंवादातून ‘राष्ट्रवादी पुन्हा’ची चर्चा सुरू झाली आहे.

## पुणे महापालिकेत रिव्हॉल्वर डोक्याला लावणे चांगलेच भोवले

**महाईन्यूज । पुणे**

**जादा कर आकारणी केल्याचा आरोप करून महापालिकेच्या कर आकारणी विभागात रिव्हॉल्वर डोक्याला लावून आत्महत्येची धमकी देणाऱ्याच्या विरोधात शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. शुक्रवारी (दि. १३) दुपारी कर आकारणी विभागाच्या कार्यालयात ही घटना घडली. महेंद्र नरसिंग लोणकर (रा. कोंढवा खुर्द) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत महापालिकेच्या कर आकारणी विभागातील कर्मचारी गणेश दिलीप ठोंबरे (३७, रा. कात्रज) यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शुक्रवारी दुपारी सव्वातीनच्या सुमारास महापालिकेच्या कर आकारणी विभागात आला होता. जादा मिळकत कर आकारण्यात आल्याचा आरोप करून कर आकारणी विभागाच्या कार्यालयातून उडी मारण्याची धमकी दिली. माझ्याकडे परवाना असलेले रीवॉल्व्हर आहे, असे सांगून आरोपीने पँटच्या खिशातून रिवॉल्व्हर काढून स्वत:च्या डोक्याला लावले. रिवॉल्व्हर काढून त्याने आत्महत्या करण्याची धमकी दिल्याचे ठोंबरे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक वलसे करत आहेत.

महापालिकेचे नवे सभागृह अस्तित्वात आल्यानंतर महापालिकेत नवख्या नगरसेवकांचा आणि त्यांच्या नवनवीन वाहनांचा जसा वावर वाढला आहे, तसाच पिस्तूल बाळगणाऱ्या कार्यकर्त्यांचाही वावर वाढला आहे. मिळकत कर थकबाकीच्या प्रकरणी महापालिकेत चकरा मारणाऱ्या एकाने पिस्तूल काढून थेट स्वत:च्या डोक्याला लावल्याची घटना शुक्रवारी दुपारी महापालिकेतील मिळकत कर विभागाच्या कार्यालयात घडली. या घटनेची महापालिका आयुक्तांनी गंभीर दखल घेतली असून संबंधीतावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आज त्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापालिकेतील चार वर्षाच्या प्रशासकराज नंतर नुकतेच महापालिका सभागृह अस्तित्वात आले आहे. महापालिकेच्या निवडणुकीत १६५ पैकी जवळपास शंभर नगरसेवक नवखे असून पहिल्यांदाच महापालिकेच्या सभागृहात पोहचले आहेत. नवीन नगरसेवकांमध्ये काही गुंठा मंत्र्यांचाही समावेश असल्याने ते आणि त्यांचे कार्यकर्ते महागड्या गाड्यांमधून महापालिकेत येतात. त्यामुळे महापालिकेच्या परिसरात नवनवीन आणि महागड्या गाड्यांचा वावर दिसतो. एकीकडे हे चित्र असताना, दुसरीकडे पिस्तूलधारक कार्यकर्त्यांचाही वावर वाढलेला दिसत आहे. महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडीवेळी काही कार्यकर्त्यांच्या कमरेला पिस्तूल सदृष्य वस्तू पहायला मिळाल्या.

# शहरात क्षेत्रीय कार्यालये वाढवण्याची मागणी

## लोकसंख्या वाढीचा मुद्दा पुढे करत भाजप नेत्यांची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दैनंदिन कामकाज सुरळीत व्हावे, म्हणून गेल्या पंचवार्षिकेत सहा क्षेत्रीय कार्यालयांचे आठ क्षेत्रीय कार्यालय करण्यात आले. आताही नगरसेवक संख्या पूर्वीप्रमाणे 128 असताना आठ क्षेत्रीय कार्यालयांचे दहा श्रेत्रीय कार्यालय करण्याची मागणी भाजपाच्या सत्ताधाऱ्यांच्या एका गटाकडून करण्यात आली आहे. मात्र, ते शक्य नसल्याचे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. आता, सत्ताधारी भाजपाकडून काय भूमिका घेतली जाणार, याची उत्सुकता आहे.**



फेबुवारी 2017 च्या निवडणूक चार सदस्यीय प्रभाग रचनेनुसार झाली. जागा 128 होत्या. त्यासाठी पूर्वीची वॉर्ड रचना फोडून नव्याने 32 प्रभाग करण्यात आले. निवडणुकीनंतर शहरातील क्षेत्रीय कार्यालयांची फेररचना करण्यात आली. सहा क्षेत्रीय कार्यालय फोडून आठ क्षेत्रीय कार्यालये करण्यात आली. शहरात 9 ऑगस्ट 2017 ला आठ क्षेत्रीय कार्यालयांची स्थापना झाली. राजकीय फायद्यासाठी सर्व आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या अध्यक्षपदी भाजपाचे नगरसेवक बसतील, अशी व्यवस्था करण्यात आली. विरोधात असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसने त्या नव्या क्षेत्रीय कार्यालयाच्या रचनेला विरोध केला नाही.

त्या निवडणुकीनंतर तब्बल 9 वर्षांने महापालिकेची निवडणूक झाली. मात्र, नगरसेवक संख्या 128 पूर्वी इतकी कायम आहे. तसेच, प्रभाग रचनाही जुनीच आहे. पुन्हा महापालिकेत भाजपाची सत्ता आली आहे. भाजपाचे अपक्ष धरून एकूण 85 नगरसेवक संख्या आहे. क्षेत्रीय कार्यालय ताब्यात असावी. तसेच, अधिकाधिक नगरसेवकांना क्षेत्रीय अध्यक्षपद भूषवता यावे म्हणून आणि राजकीय सोय पाहण्यासाठी आठ क्षेत्रीय कार्यालयांचे दहा क्षेत्रीय कार्यालय करण्याची मागणी सत्ताधारी भाजपाकडून करण्यात आली आहे.

सन 2011 च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या 17 लाख इतकी आहे. महापालिकेतील नगरसेवक संख्या 128 जुनीच आहे. तसेच, प्रभाग रचनाही जुनीच आहे. शहराचे क्षेत्र वाढलेले नाही. सध्या शहराची लोकसंख्या 30 लाखांच्या आसपास आहे. मतदार संख्येत मोठी वाढ झाली आहे. त्या आधारावर क्षेत्रीय कार्यालयांची संख्या दोनने वाढविण्याची मागणी केली जात आहे. मात्र, महापालिकेच्या दैनंदिन कामकाजांच्या दृष्टीने आठ क्षेत्रीय कार्यालये पुरेसे असून, त्या माध्यमातून कामकाज व्यवस्थित सुरू आहे, असा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे शहरात आठचे दहा क्षेत्रीय कार्यालये होणार नाहीत, असे स्पष्ट झाले आहे.

### क्षेत्रीय कार्यालये बदलल्याने नागरिकांची गैरसोय

सन 2017 ला क्षेत्रीय कार्यालये बदलण्यात आले. सहा क्षेत्रीय कार्यालयांची आठ क्षेत्रीय कार्यालये करण्यात आली. महापालिका निवडणुकीत शहरातील प्रभाग रचनेत कोणताही बदल झालेला नाही. नगरसेवक संख्या 128 पूर्वी इतकीच आहे. तसेच, नव्याने जनगणना झालेली नसल्याने शहराची अधिकृत लोकसंख्या किती हा आकडा समोर आलेला नाही. यंदा पुन्हा क्षेत्रीय कार्यालयात बदल केल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होणार आहे. नागरिकांना दूर अंतरावरील क्षेत्रीय कार्यालयात हेलपाटे मारावे लागतील. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयाची फेररचना न करता सध्य अस्तित्वात असलेल्या आठ क्षेत्रीय कार्यालयांमार्फतच कामकाज केले जावे, अशी मागणी अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नगरसेविका मनीषा शाम लांडे यांनी केली आहे.

### लोकसंख्या वाढल्याने क्षेत्रीय कार्यालये वाढवा

पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार, लोकसंख्या वाढ आणि नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेता सध्याची 8 क्षेत्रीय कार्यालयांची रचना अपुरी ठरत आहे. प्रत्येक कार्यालयावर प्रशासकीय कामांचा प्रचंड ताण असून, नागरिकांना वेळेत सेवा मिळण्यात अडचणी येत आहेत. लोकसंख्येचे प्रमाण, भौगोलिक विस्तार व प्रशासकीय सुलभतेचा विचार करता क्षेत्रीय कार्यालये संख्या 8 ऐवजी 10 करणे आवश्यक आहे. क्षेत्रीय समित्यांची संख्या 8 वरून 10 करण्यास मान्यता देण्यात यावी. त्यानुसार, पुढील आवश्यक प्रशासकीय व संरचनात्मक कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी भाजपाचे आमदार शंकर जगताप यांनी आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे केली आहे.

# झिंजूर्डे मळा परिसरात रस्ता कॉंक्रिटीकरणाला गती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे सौदागरच्या झिंजूर्डे मळा परिसरात सुरू असलेल्या १८ मीटर रुंदीच्या रस्ता कॉंक्रिटीकरण कामाची पाहणी भाजपाचे शहराध्यक्ष आणि नगरसेवक शत्रुघ्न (बापु) काटे यांनी नुकतीच केली. यावेळी नगरसेविका कुंदाताई भिसे आणि नगरसेविका अनिताताई काटे यांच्यासह कामाच्या प्रगतीची सखोल पाहणी करण्यात आली.**



> झिंजूर्डे मळा परिसरातील १८ मीटर रस्ता कॉंक्रिटीकरण काम हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. आम्ही विशेष दक्षता घेत आहोत की काम पूर्णत्वाला पोहचताना नागरिकांना कमीत कमी त्रास व्हावा, रस्ता दर्जेदार बनेल आणि वाहतूक सुरळीत होईल. तसेच परिसरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही सातत्याने देखभाल आणि पाठपुरावा करीत राहणार आहोत. नागरिकांची सुविधा आणि सुरक्षितता हेच आमचे मुख्य ध्येय आहे.
>
> – शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

पाहणीदरम्यान कामाची सद्यस्थिती, गुणवत्ता, ड्रेनेजची व्यवस्थिती आणि वाहतुकीस होणाऱ्या तणाव कमी करण्यासाठीच्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. तसेच, काम नियोजित वेळेत गुणवत्तापूर्ण पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन देण्यात आले. या पाहणीदरम्यान जयनाथशेठ काटे, संदिपशेठ काटे, स्थापत्य उपअभियंता जोशी साहेब, कनिष्ठ अभियंता टकले मॅडम आणि कॉन्ट्रॅक्टर्स उपस्थित होते. काम पूर्ण झाल्यानंतर झिंजूर्डे मळा परिसरातील वाहतूक अधिक सुरळीत होऊन नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात मोठी सोय होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी दिलेल्या आश्वासनामुळे स्थानिक नागरिकांमध्ये काम लवकर पूर्ण होईल आणि परिसरातील वाहतूक सुविधा सुधारेल, याबाबत सकारात्मक अपेक्षा निर्माण झाली आहेत.



## भूमिका

**बांगलादेशातील अलीकडील सार्वत्रिक निवडणुकीत बांगलादेश नॅशनालिस्ट पार्टी अर्थात बीएनपीला मिळालेले यश हे खरोखरच ऐतिहासिक मानावे लागेल. पक्षाचे अध्यक्ष तारिक रेहमान यांच्या नेतृत्वाखाली बीएनपीने २९९ पैकी तब्बल २०९ जागांवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत मिळवले.**

# बांगलादेशात बीएनपीचा इतिहास



बहुमतासाठी १५० जागांची आवश्यकता असताना मिळालेला हा कौल बांगलादेशातील जनतेने स्थैर्य, विकास आणि सक्षम पर्यायाच्या राजकारणाला दिलेला ठोस पाठिंबा असल्याचे दर्शवतो. ऑगस्ट २०२४ मध्ये विद्यार्थी आंदोलनानंतर शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवरून पायउतार झाले आणि देशात अस्थिरता निर्माण झाली. त्यानंतर त्यांनी भारतात आश्रय घेतला. हंगामी सरकारचे नेतृत्व नोबेल पारितोषिक विजेते महंमद युनूस यांनी स्वीकारले. या पार्श्वभूमीवर दीड वर्षांनंतर झालेल्या निवडणुकीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. सुमारे १२ कोटी मतदार असलेल्या देशात ४७ ते ५० टक्क्यांदरम्यान मतदान झाले आणि मतदारांनी स्पष्ट कौल देत बीएनपीला सत्तेची धुरा सोपवली. दुसरीकडे जमात-ए-इस्लामी यांच्या नेतृत्वाखालील ११ पक्षांच्या आघाडीला ७० जागांवर समाधान मानावे लागले. शेख हसीना यांचा अवामी लीग पक्ष या निवडणुकीत सहभागी नव्हता. त्यामुळे त्यांच्या मतांचा काही भाग बीएनपीकडे वळल्याचे दिसते. १९९१ ते २०२४ या काळात बांगलादेशच्या राजकारणावर खालिदा झिया आणि शेख हसीना या दोन नेत्या आलटून-पालटून प्रभाव टाकत होत्या. मात्र या निवडणुकीने त्या पारंपरिक संघर्षाला नवे वळण दिले आहे.

तारिक रहमान यांची राजकीय वाटचाल नाट्यमय राहिली आहे. माजी राष्ट्रपती झियाउर रहमान आणि माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे ते पुत्र. शेख हसीना सरकारच्या काळात त्यांच्यावर अनेक खटले दाखल झाले. २००८ मध्ये त्यांना देश सोडून जावे लागले आणि ते लंडनमधून पक्षाचे काम पाहत राहिले. जवळपास १७ वर्षांच्या निर्वासित जीवनानंतर २५ डिसेंबर २०२५ रोजी ते बांगलादेशात परतले. त्यानंतर काहीच दिवसांत खालिदा झिया यांचे निधन झाले आणि पक्षाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी पूर्णपणे त्यांच्या खांद्यावर आली.

अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर रहमान यांनी देशभर दौरे करत लोकांशी थेट संवाद साधला. अर्थव्यवस्थेच्या पुनर्बांधणीसाठी ठोस आराखडा मांडला, शिक्षण, दारिद्र्य आणि बेरोजगारी या मूलभूत प्रश्नांवर भर दिला. राष्ट्राभिमान, आर्थिक उभारणी आणि संस्थात्मक सुधारणा यांची सांगड घालत त्यांनी तरुणाईसह सर्व स्तरांमध्ये विश्वास निर्माण केला. खालिदा झिया यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या सहानुभूतीलाही बीएनपीला काही प्रमाणात लाभ झाला.

या निकालातून कट्टर आणि धर्मांध राजकारणाला जनतेने नकार दिल्याचे स्पष्ट होते. स्थैर्य, विकास आणि स्वाभिमान या मूल्यांना प्राधान्य देत मतदारांनी बीएनपीला साथ दिली. तथापि, नव्या सरकारसमोर आर्थिक पुनरुत्थान, पारदर्शक कारभार आणि सामाजिक सलोखा राखण्याची मोठी जबाबदारी आहे. भारतासाठीही हे घडामोड महत्त्वाची आहे. हसीना सरकारच्या काळात भारत-बांगलादेश संबंधांमध्ये व्यापार, पायाभूत सुविधा आणि दहशतवादविरोधी सहकार्य या क्षेत्रांत जवळीक वाढली होती. मात्र शेख हसीना यांना भारताने दिलेला आश्रय आणि बदलती प्रादेशिक परिस्थिती या पार्श्वभूमीवर नव्या सरकारशी संवाद कसा साधला जातो, हे पाहणे आवश्यक ठरेल. चीन आणि पाकिस्तानसारख्या देशांची वाढती जवळीकही लक्षात घ्यावी लागेल.

## प्रासंगिक »

### प्रामाणिकपणाची कमाई

***एका गावात रामू नावाचा एक गरीब पण प्रामाणिक शेतकरी राहत होता. त्याच्याकडे फारशी जमीन नव्हती, पण तो मेहनती आणि सचोटीने काम करणारा होता. एके दिवशी शेतात नांगरणी करत असताना त्याला मातीखाली एक लोखंडी पेटी सापडली.***

उत्सुकतेने त्याने पेटी उघडली तर त्यात सोन्याच्या नाण्यांनी भरलेला खजिना होता. क्षणभर रामूच्या मनात विचार आला, “हा खजिना ठेवला तर माझे आयुष्य बदलेल.” पण लगेच त्याला जाणवले की ही संपत्ती त्याची नाही. चौकशी केल्यावर कळले की ती पेटी गावातील एका वृद्ध जमीनदाराची हरवलेली होती. रामूने क्षणाचाही विलंब न लावता ती पेटी जमीनदाराकडे परत दिली. जमीनदार रामूच्या प्रामाणिकपणाने भारावून गेला. त्याने आनंदाने रामूला काही नाणी बक्षीस म्हणून दिली आणि त्याला आपल्या शेताची देखभाल करण्याची जबाबदारीही दिली.

तात्पर्य: प्रामाणिकपणा आणि चांगुलपणा यांची कमाई ही सर्वात मोठी संपत्ती असते.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात दिव्यांग बांधवांच्या हक्कांवर डल्ला मारण्याचा गंभीर प्रकार उघड होत आहे. खरे दिव्यांग बेरोजगार असताना बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे काही जण शासकीय नोकऱ्या मिळवत असल्याचे चित्र चिंताजनक आहे.

# खोटे दिव्यांग, खरी नोकरी!

हा केवळ प्रशासनातील त्रुटींचा मुद्दा नसून सामाजिक न्यायाला दिलेले उघड आव्हान आहे. १ जुलै २०२२ च्या आकडेवारीनुसार राज्यात गट ‘अ’ ते ‘ड’ या वर्गात ४,८४,९०१ शासकीय कर्मचारी कार्यरत होते. त्यापैकी मूळ नियुक्तीच्या वेळी केवळ १,६७९ कर्मचारी दिव्यांग होते (०.३४%). मात्र पुढे ही संख्या ७,४१० (१.५२%) झाली. म्हणजे १.१८% कर्मचारी सेवेत आल्यानंतर दिव्यांग ठरले. काही जण खरोखर अपघात किंवा आजारामुळे दिव्यांग झाले असतील; पण अनेक प्रकरणांत संशय निर्माण होतो. कारण दिव्यांगांना बढती, बदली सवलती, आयकर सूट आणि भत्ते मिळतात. या सुविधांचा गैरफायदा घेण्यासाठी बनावट प्रमाणपत्रांचा वापर झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

परिणामी काही कार्यालयांत कागदोपत्री दिव्यांगांची संख्या जास्त दिसते, पण प्रत्यक्षात खऱ्या दिव्यांगांना संधी मिळत नाही. बदली प्रक्रियेतही असमतोल निर्माण



होतो. हा प्रकार चतुर्थ श्रेणीपासून उच्च पदांपर्यंत पसरल्याची चर्चा आहे. प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर प्रकरणाने या समस्येकडे लक्ष वेधले, मात्र ती फक्त हिमनगाचे टोक असल्याची भावना व्यक्त होते.

स्पर्धा परीक्षा संस्थांमध्येही गैरव्यवहाराच्या तक्रारी आहेत. काही बनावट संस्थांनी दिव्यांगांच्या नावावर अनुदाने लाटल्याने शासनाने सुमारे ९०० संस्थांची नोंदणी रद्द केली. दिव्यांग प्रमाणपत्र देण्याचा अधिकार जिल्हा रुग्णालये व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील तीन सदस्यीय मंडळांना आहे. मात्र एकदा प्रमाणपत्र दिल्यानंतर सक्तीची पुनर्पडताळणी करण्याची स्पष्ट तरतूद नाही. हीच मोठी उणीव आहे.

याशिवाय थेट बनावट प्रमाणपत्रे तयार करण्याचाही मार्ग वापरला जातो. दिव्यांगांसाठी असलेल्या ‘यूडीआयडी’ (Unique Disability ID) प्रणालीचाही गैरवापर झाल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे वैद्यकीय मंडळांबरोबरच स्वतंत्र त्रयस्थ यंत्रणेमार्फत पडताळणीची सक्ती करणे आवश्यक आहे.

दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी या गैरप्रकारांची दखल घेऊन पडताळणी मोहीम सुरू केली आहे. सामाजिक न्यायासाठी हे पाऊल महत्त्वाचे आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना बदली न करता प्रक्रियेला गती देणे गरजेचे आहे. कठोर आणि पारदर्शक कारवाई झाली तरच खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळेल आणि शासकीय व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा दृढ होईल.

## ।। अभंगवाणी ।।



पांडुरंग ध्यानी, पांडुरंग मनी ।
जागृती स्वप्नी पांडुरंग ॥१॥

पडिले वळणी इंद्रिय सकळ ।
भावे एकचि पांडुरंग॥2 ॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मोदींच्या हस्ते ई-बस सेवेला हिरवा झेंडा


## नागपूरला मिळाल्या ५० ई-बसेस :पर्यावरणपूरक वाहतुकीला बळ

**महाईन्यूज । नागपूर**

**केंद्र सरकारच्या पीएम ई-बस सेवा अंतर्गत नागपूर महानगरपालिकेला मिळालेल्या पर्यावरणपूरक ५०इलेक्ट्रिक बसेसचे लोकार्पण शनिवारी पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने गुवाहाटी येथून करण्यात आले. या योजनेअंतर्गत नागपूरला १५० बसेस मिळणार असून, त्यापैकी पहिल्या टप्प्यात ५० बसेस मनपाला प्राप्त झाल्या आहेत.**




मनपातर्फे पी. एम ई बस सेवा कोराडी आगार येथे आयोजित कार्यक्रमात महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर निता ठाकरे, आमदार कृष्णा खोपडे,संदीप जोशी, उपमहापौर लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, नगरसेवक विजय झलके, प्रभारी आयुक्त वसुमना पंत, माजी महापौर दयाशंकर तिवारी, उपायुक्त व परिवहन व्यवस्थापक डॉ. मेघना वासनकर, महादुल्याच्या नगराध्यक्ष हेमलता सावजी यांच्यासह नगरसेवक, अधिकारी उपस्थित होते.




### गुवाहाटी येथील कार्यक्रमात

पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या हस्ते विविध विकास प्रकल्पांचे लोकार्पण पार पडले. यावेळी नागपूरसह देशातील चार शहरांतील एम ई-बसचे आभासी लोकार्पण करण्यात आले. यात गुवाहाटी येथे १०० बसेस, नागपूर व भावनगर येथील प्रत्येकी ५०बसेस तर चंदीगड येथील २५ बसेसचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिरवी झेंडी दाखवून चार शहरातील पर्यावरणपूरक बसचे लोकार्पण केले. पंतप्रधानांनी झेंडी दाखविल्यानंतर कोराडी आगारमध्ये सर्व उपस्थितांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. प्रारंभी दीपप्रज्वलनाणे कार्यकमाची सुरुवात करण्यात आली. महापौर नीता ठाकरे यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्वागत केले.

### प्रदुषण मुक्त वाहतुकीला बळ

पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात विकासाच्या एका वेगळ्या वाटेवर जात आहे. ई बसमुळे शहरातील नागरिकांचा प्रवास अधिक सुखकर व पर्यावरण पूरक होण्याला मदत मिळणार आहे. शहरातील दळणवळ व पर्यावरण हे दोन्ही प्रश्न महत्वाचे आहे. या दोन्ही प्रश्नांची जाण ठेऊन पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी या समस्या सोडविण्याच्या दृष्टीकोनातून शहराला पर्यावरणपूरक बस देण्याचा निर्णय घेतल्याचे महापौर नीता ठाकरे यांनी प्रास्ताविकात सांगितले.

### 'हायड्रोलिक ई-रॅम्प'

या अत्याधुनिक पी.एम. ई-बसमध्ये २५ प्रवाशांच्या बसण्याची उत्तम सोय असून, दिव्यांगांसाठी विशेष 'हायड्रोलिक ई-रॅम्प' बसवण्यात आले आहेत. याशिवाय, अवघ्या ३० मिनिटांच्या 'रॅपिड चार्जिंग'वर ही बस २२५ किलोमीटरपर्यंतचा प्रवास करू शकते. यामुळे विनाअडथळा आणि कार्यक्षम सेवा देणे शक्य होणार आहे. या बसेस शहरातील एकूण ११ महत्त्वाच्या मार्गावर चालवण्यात येणार आहेत.

# अजितदादांच्या अपघातावर सुप्रिया सुळेंची सूचक प्रतिक्रिया

**महाईन्यूज । मुंबई**

**अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यांचा विमान अपघात कसा झाला? कोणाच्या चुकीमुळे झाला? हा अपघातच होता की घातपात आहे? असे अनेक प्रश्न सातत्याने विचारले जात आहेत. आमदार रोहित पवार यांनी तर या प्रकरणी पीपीटी बनवून मुंबई आणि दिल्लीतील पत्रकारांसमोर संशयाचा धूर निर्माण केला आहे. अशातच सुप्रिया सुळेंनी सुद्धा सूचक प्रतिक्रिया दिल्या.**





राष्ट्रवादीच्या दोन्ही पक्षातून केवळ रोहित पवार आणि अमोल मिटकरी यांनीच या प्रकरणी थेट वाच्यता केली आहे. अन्यथा इतर कोणीही यावर अद्याप भाष्य केलेलं नाही. त्यामुळे शरद पवारांसह सर्वांचीच या अपघाताबाबत काय भूमिका आहे, याकडे अवघ्या राज्याचं लक्ष लागलेलं असतानाच सुप्रिया सुळे यांनीही आज यावर भाष्य करणं टाळलं.

शरद पवारांना आज पुण्यातील रुबी रुग्णालयातून पाच दिवसांनी डिस्चार्ज देण्यात आलाय. त्यावेळी त्यांनी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचे आणि शरद पवारांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना करणाऱ्या सर्वांचेच आभार मानले. यावेळी त्यांना अजित पवारांच्या अपघाती निधनाबाबत विचारण्यात आलं. या अपघाताबाबत अनेक प्रश्न निर्माण होत असल्याचं पत्रकारांनी सुप्रिया सुळेंना सांगितल्यावर, सुप्रिया सुळेंनी मोजक्याच शब्दांत प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या, या प्रकरणावर मी नंतर बोलेन.

अजित पवार यांचा विमान प्रवास ऐनवेळी ठरविण्यात आला. नियोजित वैमानिक न येता अन्य वैमानिकांनी विमान उडविले. पहिल्यांदा बारामती विमानतळावर दृशमानता चांगली होती, ती नंतर कमी कशी झाली. वैमानिक सुमित कपूर यांना दारूचे व्यसन होते. त्यामुळे अनेकदा त्यांच्यावर कारवाई झाली होती, निलंबितही केले होते. तरीही व्हीएसआर कंपनीने त्यांना पुन्हा वैमानिक म्हणून का नेमले. त्यांची मानसिक स्थिती काय होती, असे अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले.

### अजितदादांच्या अपघातावर रोहित पवारांना संशय

अजित पवार यांच्या विमानाचा अपघात नव्हे तर घातपात झाला आहे, अशी आम्हाला दाट शंका वाटते. विमान अपघाताची चौकशी सीआयडीद्वारे न करता डीजीसीएसह परदेशातील अनुभवी संस्थांकडून करावी. विमान कंपनीला युरोपात हवाई वाहतूक करण्यास बंदी घातलेली असताना भारतात परवानगी कशी दिली गेली. वैमानिक व्यसनी होता का ? असे विविध प्रश्न राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे (शरद पवार) प्रदेश सरचिटणीस आमदार रोहित पवार यांनी उपस्थितीत केले. काही दिवसांपूर्वी त्यांनी पत्रकार परिषद घेऊन अनेक मुद्दे मांडले.

# ‘व्हॅलेंटाईन्स डे’ची थरारक घटना!

## तरुणाने प्रेयसीला ठार करून स्वतःचाही घेतला जीव; कारमध्ये पडून होते मृतदेह

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**‘व्हॅलेंटाईन्स डे’ दिवशीच त्याने तिला संपविले आणि स्वतःला गोळी घातली. नोएडाच्या सेक्टर १०७ परिसरात ही धक्कादायक घटना घडली. या परिसरात एका बंद कारमध्ये ३२ वर्षीय तरुण आणि २६ वर्षीय तरुणीचा मृतदेह आढळून आला. सेक्टर ३९ पोलीस स्टेशनच्या हद्दीत पिलर क्रमांक ८४ जवर दादरी रोडवर एक संशयास्पदरित्या पार्क केलेली कार आढळून आली होती. याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहचले. तिथे पोलीस अधिकाऱ्यांना रस्त्याच्या कडेला पार्क केलेली गाडी आढळली. त्या गाडीत दोघांचे मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडले होते.**




### गोळी घालून आत्महत्या!

पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, त्या तरुणाने तरुणीवर गोळी झाडली आणि नंतर स्वतःवरही गोळी झाडून घेतल्याचा संशय आहे. मृतांची ओळख पटली आहे. तरुण हा दिल्लीतील त्रिलोकपुरी येथील असून त्याचे नाव सुमित (वय- ३२) आहे. तर तरुणी ही नोएडातील सेक्टर १०१ मधील सालारपूर येथील रहिवासी आहे. तिचे नाव रेखा (वय- २६) आहे. दोघांच्या कुटुंबियांना पोलिसांनी घटनेची माहिती दिली आहे.

### गाडी आतून लॉक होती

पोलीस घटनास्थळी पोहचल्यावर तरुण आणि तरुणी कारमध्ये मृत अवस्थेत आढळले. कार आतून लॉक केलेली होती. दोघांच्या डोक्यात गोळ्या लागल्या होत्या. तरुणाच्या हातात एक पिस्तूल सापडले. ज्यावरून तपास करणाऱ्या पोलिसांना प्राथमिक माहितीत हा आत्महत्येचा प्रकार असल्याचा संशय आला.

### मृत्यूचे नेमके कारण काय?

वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि फॉरेन्सिक टीमने पुरावे गोळा करण्यासाठी घटनास्थळाला भेट दिली. त्यावेळी त्यांनी मृतदेहांच्या भोवतीच्या परिस्थितीची तपासणी केली. या घटनेत मृत्यूचे नेमके कारण आणि घटनांचा क्रम निश्चित करण्यासाठी चौकशी पूर्ण झाल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहे. प्राथमिक तपासात ही घटना आत्महत्या असल्याचे समोर आले आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत. पोलिसांनी सांगितले की, घटना घडलेल्या परिसरातील कायदा आणि सुव्यवस्था सामान्य राहिली आहे. पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे आणि तपासकर्ते मृतांमधील संबंध आणि घटनेला कारणीभूत ठरणाऱ्या घटनांसह सर्व संभाव्य बाजू तपासत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळावरील परिस्थिती नियंत्रणात आहे. पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत. मृत्य व्यक्तींमधील परस्पर संबंध आणि घटनेचा क्रम, घटनेमागील संभाव्य कारणे जाणून घेण्यासाठी पोलीस तपास करत आहेत.

# बांगलादेशात दोन दशकांनंतर बीएनपीला सत्ता, तारिक नवे पंतप्रधान

**महाईन्यूज । ढाका**

**माजी पंतप्रधान शेख हसीना पायउतार झाल्यानंतर बांगलादेशमध्ये तब्बल १८ महिन्यांनी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ‘बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी’ (बीएनपी) या पक्षाने मोठा विजय मिळविला. ‘जमात-ए-इस्लामी’ या धर्मवादी पक्षाला नाकारताना बांगलादेशी नागरिकांनी बीएनपीच्या सुधारणावादी धोरणांच्या बाजूने कौल दिला. दोन दशकांनंतर बीएनपीने सत्ता मिळविली असून या पक्षाचे मुख्य नेते तारिक रहमान बांगलादेशचे नवे पंतप्रधान होणार आहेत. विशेष म्हणजे ३६ वर्षांनंतर या देशाला पुरुष पंतप्रधान लाभणार आहे.**




बांगलादेशमध्ये ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या विद्यार्थी आंदोलनानंतर पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार उलथून लावण्यात आले. तेव्हापासून हंगामी सरकार बांगलादेशचा कारभार सांभाळत होते. या राजकीय उलाढालीनंतर बांगलादेशमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अभूतपूर्व अशा बंदोबस्तात पार पडलेल्या या निवडणुकीत ‘बीएनपी’ मोठ्या बहुमताने निवडून आली आहे.

‘बीएनपी’चे मुख्य नेते तारिक रहमान हे बांगलादेशचे नवे पंतप्रधान असतील, यावर जवळपास शिक्कामोर्तब झाले आहे. हंगामी सरकारचे प्रमुख महंमद युनूस यांच्या जागी ते येतील. युनूस यांच्या काळात बांगलादेशचे भारताबरोबरील संबंध कमालीचे बिघडले होते. शेख हसीना यांचे भारतात येणे, बांगलादेशात अल्पसंख्य हिंदूंच्या हत्या, पाकिस्तानशी जवळीक आदी कारणांमुळे संबंधांमध्ये तणाव होता. रहमान सत्तेवर आल्यास दोन्ही देशांतील संबंध सुधारण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


माध्यमांतील वृत्तांनुसार, ‘बीएनपी’ला ३०० पैकी २०० हून अधिक जागा मिळाल्या आहेत, तर पाकिस्तानशी जवळीक असणाऱ्या ‘जमात-ए-इस्लामी’ या कट्टरपंथी पक्षाला साधारण ७५ जागा मिळाल्या आहेत. शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षाला निवडणूक लढण्यास बंदी घालण्यात आली होती.

## जेलमधून सुकेशचं जॅकलिनला 'लव्ह लेटर'



दिल्लीच्या मंडोली जेलमध्ये बंद असलेला महाठग सुकेश चंद्रशेखर पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने त्याने बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसला एक लव्हलेटर लिहिलं आहे. सुकेश यावेळी जॅकलिनला चक्क 'एअरबस H-सीरीज' हेलिकॉप्टर भेट दिल्याचा मोठा दावा केला आहे. याआधी देखील त्याने प्रायव्हेट जेट, फ्रान्समध्ये द्राक्षाची बाग, आलिशान बंगला भेट म्हणून दिला आहे. आपल्या पत्रात सुकेशने जॅकलिनला 'माय बेबी बोम्मा', 'वावा', 'एंजल' आणि 'जॅकी' अशा नावांनी संबोधलं आहे. त्याने म्हटलं आहे की, जेलच्या भिंती जरी त्यांना वेगळं करत असल्या, तरी त्याच्या हृदयाची प्रत्येक धडधड फक्त जॅकलिनचच नाव घेते. पत्रात सुकेशने त्यांच्या 'प्रेमकथे'ची तुलना रोमिओ-ज्यूलिएट, हीर-रांझा, लैला-मजनू आणि अँटनी-क्लिओपात्रा यांच्याशी केली आहे. जॅकलिनला कायदेशीर अडचणी, मानहानी आणि तणावाचा सामना करावा लागला, त्याला मीच जबाबदार आहे, असं त्याने लिहिलं. आता हे वादळ संपणार असून लवकरच सर्व काही ठीक होईल असा विश्वास त्याने व्यक्त केला. सुकेशने म्हटलं की, "मी तुला कधीही सोडणार नाही, या जन्मातही नाही आणि पुढच्या जन्मातही नाही. तू फक्त माझीच आहेस." सुकेशने पत्रात नमूद केलं की, तो जॅकलिनला कस्टम इंटीरियर असलेले एअरबस हेलिकॉप्टर भेट देत आहे. या हेलिकॉप्टरवर बाहेरून आणि आतून 'JF' ही अक्षरे (इनिशियल्स) कोरलेली असतील आणि त्याचा रंग तिच्या जेट आणि यॉटशी मिळताजुळता असेल. हे हेलिकॉप्टर माझ्या मेहनतीच्या कमाईतून खरेदी केले आहे, कोणत्याही गुन्ह्यातील नाही. मात्र कायदेशीर प्रकरणांमुळे जॅकलिन कदाचित याचा तात्काळ वापर करू शकणार नाही, हे देखील त्याने मान्य केलं. सुकेशने असं पत्र लिहिण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही व्हॅलेंटाईन, ख्रिसमस, नवरात्री आणि जॅकलिनच्या वाढदिवसानिमित्त त्याने अशाच प्रकारची पत्रं लिहून प्रायव्हेट जेट, वाईनयार्ड, पेंटहाऊस आणि लक्झरी कार सारख्या महागड्या भेटवस्तूंचा दावा केला होता.गेल्या व्हॅलेंटाईन डेलाही त्याने कस्टमाइज्ड 'गल्फस्ट्रीम प्रायव्हेट जेट' भेट दिल्याचं म्हटलं होतं. सुकेश नेहमीच त्याचं जॅकलिनवर असलेलं प्रेम व्यक्त करत असतो.

## ब्रेकअप की पुन्हा प्रेम...?



बॉलीवूड अभिनेत्री तारा सुतारियाने तिच्या नवीन फोटोशूटमधील ग्लॅमरस फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केले. तिच्या या लूकचे चाहत्यांनी भरभरून कौतुक केले. मात्र, सर्वांचे लक्ष वेधून घेतले तिचा कथित एक्स-बॉयफ्रेंड वीर पहारियाने या पोस्टला दिलेल्या लाईकने. या महिन्याच्या सुरुवातीला तारा आणि वीर यांच्या ब्रेकअपच्या बातम्या व्हायरल झाल्या. या चर्चांना आणखी हवा मिळाली ती ए.पी. ढिल्लनच्या मुंबईतील कॉन्सर्टनंतर. जिथे त्याने ताराला मिठी मारून किस केल्याचा व्हिडीओ आणि फोटो समोर आले. त्यानंतर वीरने १ फेब्रुवारीला वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला. या पार्टीला भूमी पेडणेकर, रिया चक्रवर्ती, न्यासा देवगण असे अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते. मात्र, यात तारा दिसली नाही. ज्यामुळे ब्रेकअपच्या चर्चांना अधिकच बळ मिळाले. ताराने ऑगस्टमध्ये वीरसोबतचे नाते इन्स्टाग्रामवर अधिकृत केले होते. मात्र, सध्या दोघेही या नात्याबाबत थेट प्रतिक्रिया देत नसल्यामुळे चाहत्यांमध्ये संभ्रम कायम आहे. तारा लवकरच ‘टॉक्सिक’या बहुप्रतिक्षित चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात यश मुख्य भूमिकेत असून, कियारा अडवाणी, नयनतारा, हुमा कुरेशी आणि रुक्मिणी वसंत हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत.

## अंकिता लोंखडे गूड न्यूज देणार?



टेलिव्हिजनवरील लोकप्रिय जोडपे म्हणून अंकिता लोखंडे आणि विकी जैन यांना ओळखले जाते. दोघांचाही सोशल मीडियावर सतत वावर असतो. सोशल मीडियावरील पोस्टच्या माध्यमातून दोघेही आपल्या चाहत्यांच्या संपर्कात असतात. सोशल मीडियावरील त्यांच्या चाहत्यांची संख्या अधिक असून, चाहते नेहमी त्यांच्या पोस्टवर कमेंट्स करून प्रतिक्रिया देत असतात. गेल्या काही दिवसांपासून अंकिताच्या गरोदरपणाच्या अफवा पसरत आहेत, परंतु दोघांनीही यावर मौन बाळगले असून, अद्यापर्यंत कोणतीही प्रतिक्रिया याबाबत दिलेली नाही. अशातच अंकिता लोखंडेने तिच्या इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर केली असून, या पोस्टने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. पोस्टमध्ये अंकिताने विकीसोबतचा केलेले फोटोशूट शेअर केले आहे. दोघेही रॉयल लूकमध्ये दिसत आहेत. पोस्टमध्ये अंकिताने लिहिले आहे की, “सजना आणि सजनी. आमच्यात काहीतरी खास आहे. आम्ही एकमेकांसाठी बनलेलो आहोत. प्रामाणिकपणे सांगायचे तर, आम्ही व्हॅलेंटाईन डेपेक्षा महाशिवरात्रीची जास्त उत्सुकता बाळगतो कारण...” अंकिताने पुढे लिहिले आहे, “थांबा.” अंकिताच्या पोस्टवरून चाहते असा अंदाज लावत आहेत की, १५ फेब्रुवारीला घरोदरपणाची घोषणा करणार आहे. तशा कमेंट्स या पोस्टवर नेटकऱ्यांनी केल्या आहेत. अंकिता लोखंडे आणि विकी जैन यांच्या कामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास सध्या कलर्स टीव्हीवरील “लाफ्टर शेफ” मध्ये दोघेही एकत्र दिसत आहेत. त्यांची केमिस्ट्री, भांडणे आणि प्रेम स्पष्टपणे दिसून येते. या शो व्यतिरिक्त, त्यांनी एका संगीत अल्बमवर देखील काम केले आहे. अंकिताने केलेल्या पोस्टमध्ये चाहत्यांना लवकरच आनंदीची बातमी मिळणार असल्याची आशा ते बाळगून आहेत.

## साडीमध्ये घाबरलेली क्रिस्टल डिसूझा..



टीव्ही आणि चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री क्रिस्टल डिसूझा हिने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत ‘शरारत’ गाण्याच्या लॉन्चसोबत जोडलेली एक खास आठवण सांगितली. या कार्यक्रमात तिच्यासोबत अभिनेता रणवीर सिंह उपस्थित होता. क्रिस्टलने सांगितले की, ‘शरारत’ गाण्याच्या लॉन्चवेळी स्टेजवर जाऊन परफॉर्म करण्याचा तिचा अजिबात विचार नव्हता. गाणे गायिका जॅस्मिन सँडलास आणि मधुबंती बागची यांनी सादर केले. गाणे सुरू होताच प्रेक्षकांनी जबरदस्त प्रतिसाद दिला आणि संपूर्ण वातावरण उत्साहाने भरून गेले. त्या वेळी क्रिस्टल साडीमध्ये होती आणि स्टेजवर नाचण्यासाठी तयार नव्हती. ती थोडी घाबरलेलीही होती. तेव्हा रणवीर सिंह तिच्याकडे आला आणि म्हणाला, “हे तुझं गाणं आहे, तू स्टेजवर जाऊन परफॉर्म करायलाच हवं. हा तुझा क्षण आहे.” रणवीरच्या प्रोत्साहनामुळे क्रिस्टलने धाडस करून स्टेजवर परफॉर्म केले. रणवीरने आधी गायिकांना पूर्ण वेळ दिला आणि त्यानंतर पुन्हा गाणे लावून क्रिस्टलला मध्यभागी ठेवत तिला चमकण्याची संधी दिली. या आठवणीबद्दल बोलताना क्रिस्टल भावुक झाली. ती म्हणाली, “एवढ्या मोठ्या स्टारने मला तो क्षण जगू दिला, हे माझ्यासाठी खूप खास होतं.” तिच्या मते, खरा सुपरस्टार तोच असतो जो इतरांनाही पुढे येण्याची संधी देतो. वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर रणवीर सिंह सध्या ‘धुरंधर’ या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. तर क्रिस्टल देखील तिच्या नव्या प्रोजेक्ट्समध्ये व्यस्त आहे. मात्र ‘शरारत’ गाण्याच्या लॉन्चचा तो खास क्षण तिच्यासाठी कायम लक्षात राहणार आहे.

# भारत-पाक सामन्यावर पावसाचं सावट!

## सामना रद्द झाल्यास दोन्ही संघ सुपर-८ मध्ये; अमेरिका-नेदरलँड्सला फटका

**महाईन्यूज । मुंबई**

**भारत-पाकिस्तान टी-२० विश्वचषक २०२६ सामना १५ फेब्रुवारीला खेळवला जाणार आहे. कोलंबोतील आर प्रेमदासा स्टेडियममध्ये होणाऱ्या या सामन्यात पाऊस व्यत्यय आणण्याची दाट शक्यता आहे. हवामान खात्याने कोलंबोमध्ये पावसाचा इशारा जारी केला आहे. ज्यामुळे आता भारत-पाकिस्तान सामना पावसामुळे रद्द झाल्यास काय होणार, जाणून घेऊया.**




हवामान खात्याने कोलंबोसाठी पावसाचा इशारा जारी केला आहे. १४ फेब्रुवारी रोजी आग्नेय बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे आणि १५-१६ फेब्रुवारीपर्यंत ते वादळात रूपांतरित होऊ शकतं. ज्यामुळे श्रीलंकेत पूर येण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. श्रीलंकेच्या दक्षिण किनाऱ्यावर असलेल्या यायाला, मातारा, हंबनटोटा, टांगल्ला आणि गॅले सारख्या भागात पाऊस पडण्याची शक्यता आहे. पश्चिम किनाऱ्यावर थोडे उंचावर असलेल्या कोलंबोमध्येही पाऊस पडण्याची शक्यता आहे.

सामना रद्द झाला तर काय होणार?

२०२६ च्या टी२० विश्वचषकातील भारत-पाकिस्तान सामना बऱ्याच नाट्यमय घडामोडींनंतर होणार आहे. बांगलादेश टी-२० विश्वचषकातून बाहेर पडल्यानंतर निषेध म्हणून पाकिस्तानने भारताविरुद्ध खेळण्यास नकार दिला होता. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेसोबत (ICC) झालेल्या बैठकीनंतर, त्याने स्पर्धेत भारताविरुद्ध खेळण्यास सहमती दर्शवली. पण आता पावसामुळे हा सामना नाही झाला, तर कोणाचं नुकसान होणार? भारत-पाकिस्तान सामना रद्द झाला तर कोणत्या संघाला फायदा होईल आणि कोणाला तोटा होणार हे जाणून घेऊया. सुरूवातीचे दोन्ही सामने जिंकल्याने दोन्ही संघांसाठी फायदेशीर ठरेल, कारण सध्या त्यांचे प्रत्येकी ४ गुण आहेत. जर सामना रद्द झाला तर भारत आणि पाकिस्तानचे प्रत्येकी ५ गुण होतील आणि दोघेही सुपर-८ साठी पात्र ठरतील. तर अमेरिका आणि नेदरलँड्ससाठी हे नुकसान असेल.

विशेषतः अमेरिकेला सलग दुसऱ्यांदा सुपर ८ मध्ये पोहोचण्याची संधी गमवावी लागेल. नेदरलँड्स आणि अमेरिकेचे प्रत्येकी २ गुण आहेत, फक्त एक सामना शिल्लक आहे. जरी त्यांनी दोन्ही सामने जिंकले तरी त्यांचे प्रत्येकी ४ गुण असतील, परंतु ते पुरेसे ठरणार नाही.

दुसरीकडे, जर भारत-पाकिस्तान सामना झाला तर यापैकी एक संघ पुढील फेरीत पोहोचेल, परंतु दुसऱ्या संघाला नेदरलँड्स आणि यूएसएशी सामना करावा लागेल. पण, नेदरलँड्सचा मार्ग कठीण असेल, कारण त्यांचा अखेरचा सामना भारताविरुद्ध आहे. अमेरिकेचा शेवटचा सामना नामिबियाशी होईल, ज्यांनी अद्याप एकही सामना जिंकलेला नाही. जर टीम इंडियाने १५ फेब्रुवारीला पाकिस्तानला हरवलं आणि नंतर नामिबियानेही पाकिस्तानला हरवून अपसेट निर्माण केला आणि यानंतर जर स्वतः अमेरिकेकडून पराभूत झाले तर अमेरिकन संघ पुढील फेरीत पोहोचेल.

# हरभजन सिंग माजी पाकिस्तानी खेळाडूवर संतापला!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील टी-२० विश्वचषक सामना अवघ्या एका दिवसावर आला आहे. या सामन्याची सर्वच जण आतुरतेने वाट पाहत आहेत. पण यापूर्वी हरभजन सिंगच्या एका व्हीडिओने सर्वांचं लक्ष वेधलं आहे. हरभजन सिंगने युट्युबला व्हीडिओ शेअर करत माजी पाकिस्तानी खेळाडू तन्वीर अहमदची लाज काढली आहे. त्याच्या एका वक्तव्यावर हरभजन चांगलाच संतापलेला दिसला.**



हरभजन सिंगने व्हीडिओच्या माध्यमातून शेवटचा इशारा दिला आहे. हरभजन या व्हीडिओच्या सुरूवातीला म्हणत आहे, “हा व्हिडिओ क्रिकेटबद्दल नाहीये. तर एका तुच्छ व्यक्तीबद्दल आहे ज्याने माझ्यावर टीका केली आहे. खरंतर मला हेच कळत नाहीये की, तो नक्की कोण आहे. पण जेव्हा जेव्हा मी पाहतो तो काही ना काही नवीन नाटकं करत असतो. तुम्हाला माहितीये का हा माणूस कोण आहे. हा कोणी तन्वीर अहमद आहे, ज्याने पाकिस्तानसाठी ३-४ सामने खेळले आहे. पण असा वागतो जसा की इमरान खान किंवा वसीम अक्रम असेल.”

हरभजन पुढे म्हणाला की, “पाकिस्तानमध्ये अनेक दिग्गज क्रिकेटपटू झाले, पण ते कधीही अशी वक्तव्यं करत नाहीत. मात्र तुझ्यासारखे, ज्यांची ना फारशी कारकीर्द ना मोठी कामगिरी, असे लोकच जास्त बोलतात. लाज वाटली पाहिजे तुला. मी आयएल टी-२० ही दुबईत होणारी लीग कव्हर करत होतो. या स्पर्धेत ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, इंग्लंड आणि यावर्षी भारताचेही खेळाडू होते, जसे दिनेश कार्तिक वगैरे सहभागी झाले होते. मी तिथे समालोचक/ब्रॉडकास्टर म्हणून काम करत होतो. ब्रॉडकास्टरचं काम काय असतं? तर सामनावीर ठरलेल्या खेळाडूची मुलाखत घेणं.”

### हरभजन तन्वीर अहमदवर अचानक का संतापला?

तो पुढे म्हणाला, “त्यांचा एक फिरकी गोलंदाज आहे, जो थांबून मग चेंडू टाकतो. त्याने एका सामन्यात तीन विकेट्स घेतल्या आणि संघाला विजय मिळवून दिला, त्यामुळे तो ‘सामनावीर’ ठरला. अशा वेळी माझं काम त्याला खेळपट्टीबद्दल, गोलंदाजीबद्दल प्रश्न विचारण्याचं असतं. पण मी त्याची मुलाखत घेतली म्हणून याला त्रास होतो. उलट मी मुलाखत घेतली नसती तर म्हणाला असता की तो पाकिस्तानी असल्यामुळे मुलाखत घेतली नाही.”

हरभजनने सांगितलं की त्याने माझ्याबद्दल असं म्हटलं की, “हा जिथे पाकिस्तानी खेळाडू दिसतो तिथे चिकटतो.” ए, माझं ऐक, पाकिस्तानमधील जे दिग्गज खेळाडू आहेत, ते कधीही अशी भाषा वापरत नाहीत. ते इतर खेळाडूंना आदर देतात. वसीम, वकार किंवा इतर मोठे खेळाडू कोणाबद्दल अशा पद्धतीने बोलत नाहीत. पण ज्याने आयुष्यात काहीच विशेष साध्य केलेलं नाही, तो मात्र छोट्या चॅनेलवर बसून अशा प्रकारची वक्तव्यं करतो. तन्वीर, ही बडबड बंद कर आणि आमच्याकडे बघण्याचीही गरज नाही. माझ्या नादी लागू नकोस. यावेळी मी काही बोललो नाही, पण पुढच्या वेळी मात्र तुझी चांगलीच खरडपट्टी काढेन.”

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। रविवार ।
दि. 15 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पिंपरी-चिंचवडकरांना साडेचार कोटींचा फटका!

## शेअर मार्केटमध्ये नफ्याचे आमिष; अनेक नागरिकांची फसवणूक

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

**शेअर मार्केटमधील गुंतवणूक, शेअर ट्रेडिंग, क्रिप्टो'मध्ये गुंतवणुकीच्या आमिषाने पाच प्रकरणात ४ कोटी ५० लाख चार हजार ९४८ रुपयांची फसवणूक झाली आहे. याबाबत सायबरसह विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**



### बनावट 'सीएमसी' कंपनीच्या नावाखाली दीड कोटींची फसवणूक

वाकड परिसरातील एका व्यक्तीला बनावट कंपनीच्या नावाखाली शेअर मार्केटमधील ईटीएफ गुंतवणुकीचे आमिष दाखवत दीड कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली. हा प्रकार १ नोव्हेंबर २०२५ ते ३० डिसेंबर २०२५ दरम्यान घडला आहे. याबाबत वाकड येथील एका पुरुषाने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ११ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी बनावट कंपनीचे संकेतस्थळ वापरून शेअर मार्केटमध्ये ईटीएफ गुंतवणुकीत मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. फिर्यादीकडून तब्बल एक कोटी ५१ लाख आठ हजार ५३० रुपये गुंतवून घेतले. त्यानंतर खात्यात १ कोटी रुपयांचा आभासी नफा दाखवून तो काढण्यासाठी आणखी ५३ लाख रुपयांची अतिरिक्त मागणी करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात गुंतवलेली रक्कम आणि कथित नफा परत न देता आरोपींनी संपर्क तोडला. सायबर पोलीस तपास करत आहेत.

### शेअर मार्केटच्या नावाखाली १.२३ कोटींची फसवणूक

शेअर मार्केटमध्ये ३०० ते ५०० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून एकाची तब्बल एक कोटी २३ लाख रुपयांची सायबर फसवणूक करण्यात आली. ही घटना म्हाळुंगे येथे घडली. याबाबत बावधन येथील एका पुरुषाने बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी यांच्याशी संपर्क साधून विश्वास संपादन केला. त्यानंतर शेअर मार्केटमध्ये ३०० ते ५०० टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून मोबाइल ॲपच्या माध्यमातून एक कोटी २३ लाख रुपयांची गुंतवणूक करण्यास भाग पाडून पाडले. फिर्यादी यांनी पैसे परत मागितल्यावर आणखी रक्कम भरण्याची मागणी केली. बावधन पोलीस तपास करत आहेत.

### 'शेअर ट्रेडिंग'च्या नावाखाली ६४ लाखांची फसवणूक

शेअर ट्रेडिंगमधून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एकाची ६४ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना संभाजीनगर, चिंचवड एमआयडीसी परिसरात घडली. याबाबत संभाजीनगर, चिंचवड येथील पुरुषाने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादीला व्हॉटसअपवर संपर्क साधला. एका ग्रुपमध्ये सहभागी करून घेतले. त्यानंतर एका लिंकच्या माध्यमातून शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. सुरुवातीला खोटा नफा दाखवून विश्वास संपादन करण्यात आला. नफा काढण्यासाठी विविध कर व शुल्क भरण्याच्या नावाखाली वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास भाग पाडण्यात आले. एकूण ६४ लाख ४० हजार २१७.१२ रुपये फिर्यादीकडून उकळल्यानंतर आरोपींनी संपर्क तोडला. सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे तपास करत आहेत.

### 'सीबीआय' अधिकारी असल्याचे सांगून ३५ लाखांची फसवणूक

सीबीआय अधिकारी असल्याचे भासवून पिंपरीतील व्यक्तीकडून ३५ लाख रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना मोरवाडी, पिंपरी येथे घडली. याप्रकरणी तीन अज्ञात मोबाइल धारकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपरी येथील एका पुरुषाने याबाबत संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरूवातील संपर्क केलेल्या आरोपीने आपण सीबीआय अधिकारी असल्याचे सांगितले. आरोपींनी मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अडकवण्याची भीती दाखवून खात्याची पडताळणी करण्याच्या नावाखाली ३५ लाख रुपयांची रक्कम ट्रान्सफर करून घेतली. तपासणी नंतरही ती रक्कम परत न देता फसवणूक केली. संत तुकारामनगर पोलीस तपास करत आहेत.

### क्रिप्टोकरन्सीमधील गुंतवणूकीच्या आमिषाने फसवणूक

बिटकॉइन व इतर क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणुकीवर मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका व्यक्तीची ३१ लाख ३५ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. हा प्रकार ७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ दरम्यान आकुर्डी येथे घडला आहे. याबाबत आकुर्डी येथील पुरुषाने निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका महिलेसह सहाजणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांनी क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी एका वेबसाईटवर लॉगिन केले. आरोपींनी त्यांच्याशी संपर्क साधून एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सहभागी करून घेतले. त्यानंतर कोणत्या क्रिप्टोकरन्सीत किती रक्कम गुंतवायची व कोणत्या बँक खात्यात पैसे जमा करायचे याबाबत त्यांना सूचना देण्यात आल्या. त्या सूचनांनुसार फिर्यादीकडून विविध बँक खात्यांमध्ये एकूण ३१ लाख ३५ हजार ४० रुपये जमा करून घेण्यात आले.

# डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम विद्यापीठाची पीएचडी प्रदान

## संगणक शास्त्रात पीएच.डी. संपादन करून महाविद्यालयाचा गौरव

महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड

**एम. आय. टी. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील प्रा. बारीन शेख यांनी संगणक शास्त्र विषयात पीएच.डी. पदवी यशस्वीरित्या संपादन केली आहे. त्यांनी "बिग डेटामध्ये फेअर शेड्युलरचे लोड बॅलेंसिंग परफॉर्मन्स सुधारण्यासाठी पार्टिकल स्वॉर्म ऑप्टिमायझेशन दृष्टिकोन" या विषयावर संशोधन पूर्ण केले.**





हे संशोधन बिग डेटा फेअर शेड्युलरच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी निसर्ग-प्रेरित अल्गोरिदम पार्टिकल स्वॉर्म ऑप्टिमायझेशन चा वापर करून करण्यात आले आहे. त्यांना ही पदवी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यापीठ, इंदूर (मध्यप्रदेश) यांच्याकडून प्रदान करण्यात आली. त्यांचा संशोधन विषय बिग डेटा प्रणालींमध्ये वापरल्या जाणाऱ्या फेअर शेड्युलर या तंत्राच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यावर आधारित आहे.

मोठ्या प्रमाणावर डेटा प्रक्रिया करताना विविध कामांमध्ये संसाधनांचे योग्य वाटप (लोड बॅलन्सिंग) होणे अत्यंत महत्त्वाचे असते. या समस्येवर उपाय म्हणून त्यांनी पार्टिकल स्वॉर्म ऑप्टिमायझेशन या निसर्ग-प्रेरित अल्गोरिदमचा वापर केला. या संशोधनात PSO पद्धतीच्या साहाय्याने शेड्युलरची कार्यक्षमता, गती आणि संसाधनांचा वापर अधिक संतुलित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या दृष्टिकोनामुळे बिग डेटा प्रोसेसिंग अधिक जलद, अचूक आणि परिणामकारक होऊ शकते, ज्याचा उपयोग मोठ्या प्रमाणावर डेटा हाताळणाऱ्या उद्योग, संशोधन संस्था आणि क्लाउड कम्प्युटिंग प्रणालींना होऊ शकतो.

त्यांना डॉ. दीपिका पाठक यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यापीठाचे कुलगुरू व मार्गदर्शक व महाविदयालयातील संचालक डॉ बी बी वाफारे या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, "हे संशोधन देशातील तंत्रज्ञान विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरेल." त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविदयालयातील सर्व प्राध्यापकांनी विविध क्षेत्रातील मान्यवर, सहकारी व मित्रपरिवार यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

# एआय फेस्ट २०२६ ची दमदार सुरुवात; चेअरमनचा डिजिटल ट्विन अवतार चर्चेत

महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड

**कृत्रिम बुद्धिमत्ता काळात देशाच्या शिक्षण क्षेत्रातील एक ऐतिहासिक क्षण म्हणून एएसएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सने ९ फेब्रुवारी रोजी 'एएसएम एआय फेस्ट २०२६'ची भव्य सुरुवात केली. या अनोख्या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी औद्योगिक शिक्षण मंडळाचे चेअरमन डॉ. संदीप पाचपांडे यांच्या एआय-आधारित 'डिजिटल ट्विन' अवताराने दूरस्थ अंतरावर असलेल्या विविध दहा कॅम्पसमध्ये एकाच वेळी बीजभाषण करत उपस्थितांना थक्क केले.**



> "औद्योगिक शिक्षण मंडळाने गेल्या चार दशकांहून अधिक काळात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधुनिक बदलांची दखल घेत हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण प्रशिक्षण देत उभे केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातही एआयच्या वापरातील आव्हाने, कौशल्य विकास आणि माणसांच्या दैनंदिन जगण्याशी संबंधित संशोधन यावर लक्ष केंद्रित केले आहे. एआय फेस्ट हा दीर्घकालीन उपक्रम आहे. तो इतर अनेक शैक्षणिक संस्थांनाही दिशाआणि प्रेरणा देईल. भारत सरकारच्या एआय धोरणाला सुसंगत असा हा प्रयोग आहे."
>
> -डॉ. संदीप पाचपांडे

डॉ. पाचपांडे प्रत्यक्ष उपस्थित असताना त्यांच्या अत्याधुनिक एआय 'डिजिटल ट्विन'ने हजारो विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांना संबोधित केले. या अनोख्या प्रयोगामुळे एआयच्या युगात शैक्षणिक परिवर्तनाच्या नव्या पर्वाची नांदी दिली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

हा उपक्रम भारत सरकारच्या 'इंडियन आय मिशन' आणि 'डिजिटल इंडिया' या महत्त्वाकांक्षी ध्येयांशी सुसंगत आहे. शिक्षणाच्या दैनंदिन प्रक्रियेत, वर्गातील अध्यापनापासून ते प्रशासकीय कामकाजापर्यंत एआयचा समावेश करून एएसएम भारताला जागतिकस्तरावरील कुशल एआय मनुष्यबळ निर्माण करण्याच्या पंतप्रधानांच्या उद्दिष्टाला हातभार लावला जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

'लर्निंग टुडे, . लिडिंग टुमारो' या संकल्पनेवर आधारित एएसएम एआय फेस्ट २८ फेब्रुवारीपर्यंत सर्व शाळा आणि महाविद्यालयात सुरू राहणार आहे. या महोत्सवात सहा हजारांहून अधिक विद्यार्थी, प्राध्यापक तसेच प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग असून, प्रत्यक्ष अनुभवाधारित प्रशिक्षणावर भर देण्यात आला आहे. शिक्षण, संशोधन, अध्यापन पद्धती आणि संस्थात्मक व्यवस्थापन या सर्वस्तरांवर एआयचा प्रभावी वापर करण्यासाठी ही व्यापक कौशल्य चळवळ उभारण्यात आली असल्याचे डॉ. पाचपांडे यांनी सांगितले.

पारंपरिक अभ्यासक्रमाच्या चौकटीबाहेर जाऊन जागतिक दर्जाच्या एआय तज्ज्ञांकडून या सर्व कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक पदवीधर विद्यार्थ्याने 'एआय फर्स्ट माईंडसेट' अंगीकारवा, एआयला प्रतिस्पर्धी नव्हे तर सशक्तीकरणाचे साधन समजून कौशल्य कुशलता प्राप्त करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याने ते म्हणाले.

"एआय माणसांची जागा घेईल, अशी भीती व्यक्त केली जाते. मात्र आमचा दृष्टिकोन वेगळा आहे. जे एआयचा योग्य वापर करतील, तेच पुढे जातील," असे प्रतिपादन डॉ. पाचपांडे यांनी केले. "हा महोत्सव आमचे विद्यार्थी आणि शिक्षक यांना यशाच्या बाजूला उभे करेल," असेही त्यांनी स्पष्ट केले.

२८ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व संस्थांमध्ये समारोप सोहळा होणार असून, चेअरमन यांच्या नेतृत्वाखाली संचालक, डीन आणि प्राचार्यांनी या भव्य उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. एआय-संलग्न शिक्षण क्षेत्रात एएसएमने अग्रणी भूमिका घेतल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले आहे

# पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये राष्ट्रीय परिषद उत्साहात संपन्न

## आर्किटेक्चर क्षेत्रातील नवतंत्रज्ञानावर राष्ट्रीय स्तरावरील मंथन




**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे 'इनोव्हेशन इन आर्किटेक्चर, टेक्नॉलॉजी अँड अलाइड फील्ड्स' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद १३ व १४ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडली. देशभरातील वास्तुविशारद, संशोधक आणि विद्यार्थ्यांचा या परिषदेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्यात आला.**

परिषदेचे उद्घाटन नामवंत संरक्षक (CONSERVATIONIST) डॉ. बेनी कुरीकोस तसेच COUNCIL OF ARCHITECTURE, नवी दिल्लीचे अध्यक्ष आर्किटेक्ट अभय पुरोहित यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी डॉ. बेनी कुरीकोस यांनी ऐतिहासिक वारसा जतन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले. आर्किटेक्ट अभय पुरोहित यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना व्यावसायिक नीतिमत्ता, बदलते जागतिकीकरण आणि वास्तुविशारदांनी काळानुरूप स्वतःला सुसंगत ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

राष्ट्रीय परिषदेच्या बक्षीस समारंभासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमास संस्थेचे संचालक श्री तेजस सतेज पाटील, कार्यकारी संचालक ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त) आणि मुख्य वित्त अधिकारी श्री बिपीन शर्मा उपस्थित होते.

DYP
DR. D.Y.PATIL COLLEGE OF ARCHITECTURE AKURDI

त्यांनी संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले.

परिषदेच्या दोन दिवसांत विविध अभ्यासपूर्ण तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. पर्यावरणपूरक डिझाइन, आर्किटेक्चर क्षेत्रातील आधुनिक एआयचा वापर, शाश्वत विकास आणि नवतंत्रज्ञान यांसारख्या विषयांवर सखोल चर्चा झाली. देशभरातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपले संशोधन निबंध सादर केले. त्यातील उत्कृष्ट संशोधन कार्याचा गौरव करण्यात आला. परिषदेला उपस्थित नामवंत वास्तुविशारदांनी त्यांच्या प्रकल्पांतील अनुभवांचे सादरीकरण केले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाची मोलाची शिदोरी मिळाली.

परिषदेच्या तांत्रिक सत्रांचे समन्वयन संयोजक व प्रभारी प्राचार्या आर्किटेक्ट छाया तिवारी यांनी यशस्वीपणे पार पाडले. देशभरातून आलेल्या पाहुण्यांनी आयोजन आणि नियोजनाचे विशेष कौतुक केले.

या भव्य परिषदेचे नियोजन महाविद्यालयाचे संयोजक व प्राचार्य डॉ. धनंजय चौधरी तसेच संयोजक व प्रभारी प्राचार्या आर्किटेक्ट छाया तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली परिषदेने शैक्षणिक व तांत्रिक स्तरावर उच्चांक प्रस्थापित केला. संशोधक वृत्ती जोपासण्याचे महत्त्व अधोरेखित करत ही परिषद आर्किटेक्चर क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरली.

# 'पीसीसीओईआर'ला विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सर्वोत्कृष्ट महाविद्यालय या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र – कुलगुरु डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर यांनी महाविद्यालयाच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. दीड लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचलित पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) या महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तर्फे 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य सोहळ्यात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी तसेच प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाच्या वतीने उद्योजक नरेंद्र लांडगे आणि अजिंक्य काळभोर यांनी पुरस्कार स्वीकारला. या पुरस्कारामध्ये दीड लाख रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह आणि मानपत्राचा समावेश होता.

या गौरवप्रसंगी पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरीश तिवारी, उपसंचालक डॉ. राहुल मापारी, रजिस्ट्रार प्रकाश येवले यांच्यासह प्राध्यापक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधनात्मक आणि प्रशासकीय कार्यक्षमतेला विद्यापीठ पातळीवर मान्यता मिळाल्याचे अधोरेखित झाले.

सन २०१४ मध्ये स्थापन झालेल्या पीसीसीओईआरने अल्पावधीतच गुणवत्ता, संशोधन आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. महाविद्यालयाला यापूर्वी राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदेचे (NAAC) 'ए प्लस प्लस' मानांकन प्राप्त झाले असून चार विभागांना राष्ट्रीय मानांकन मंडळाचे (NBA) मानांकन मिळाले आहे. तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची (AICTE) मान्यता आणि शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून स्वायत्ततेचा दर्जाही महाविद्यालयाला बहाल करण्यात आला आहे.

सध्या महाविद्यालयात ३००० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संशोधनक्षम वातावरणाची जपणूक करताना ४४ पीएच.डी. धारक प्राध्यापक कार्यरत असून ५५ प्राध्यापक पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत. संशोधन आणि बौद्धिक संपदा हक्कांच्या क्षेत्रातही पीसीसीओईआरने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आतापर्यंत ४१९ पेटंट अर्ज दाखल करण्यात आले असून त्यापैकी २८५ प्रकाशित, ५० मंजूर आणि ३ पेटंटचे व्यावसायीकरण करण्यात आले आहे. कॉपीराइट व पेटंट क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडिया'कडून दोन वेळा प्रमाणपत्र देऊन महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला आहे.

या यशाबद्दल ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर तसेच कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी वर्गाचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांनी भविष्यातही उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा आणि संशोधनाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.

# ASM Chairman Clones Himself to Launch Massive AI Revolution

## Simultaneous Digital Twin Address Launches Massive National AI Skilling Drive

**MAHAENEWS I PUNE**

**In a defining moment for Indian education, the ASM Group of Institutes launched the ASM AI Fest 2026 on 9 February with a historic technological demonstration: a simultaneous keynote address delivered across 10 campuses by the AI Digital Twin of Chairman Dr. Sandeep Pachpande.**



While the real Dr. Pachpande watched from the wings, his hyper-realistic AI avatar addressed thousands of students, faculty, and staff, marking the beginning of a comprehensive institutional transformation.

The initiative is strategically designed as a force multiplier for the Government of India's 'IndiaAI Mission' and 'Digital India' vision. By embedding AI into the daily fabric of education—from classroom teaching to institutional administration—ASM is directly contributing to the Prime Minister's goal of establishing India as a global hub for skilled AI talent.

The launch sets the stage for the ASM AI Fest, running through 28 February. It is one of the region's largest skilling initiatives, engaging over 6,000 stakeholders—including students, faculty, and significantly, non-teaching administrative staff—in immersive, hands-on AI training. Centered on the theme "Learning Today. Leading Tomorrow," the festival seeks to shift academic culture from passive awareness to active AI adoption across teaching, research, learning methodologies, and institutional administration.

By embedding AI into the daily fabric of education, ASM aims to ensure that every graduating student develops an "AI-First" mindset — not as a replacement for human capability, but as a force multiplier for it.

Moving beyond standard curriculum, the fest employs world-class AI experts to conduct workshops that focus on real-world application. The objective is to ensure that every ASM graduate possesses an "AI-First Mindset," viewing AI not as a competitor, but as an empowerment tool.

Together, these initiatives demonstrate that ASM's AI movement is not a short-term celebration, but a sustained transformation agenda.

"The fear is that AI will replace people. Our philosophy is different: People who use AI will replace those who don't," Dr. Pachpande added. "This summit ensures our students and faculty are on the winning side of that equation."

The ASM AI Fest will conclude on 28 February 2026 with a grand closing ceremony across all institutions. Under the Chairman's leadership, the Directors, Deans, and Principals of the group have spearheaded this massive logistical feat, positioning ASM as a pioneer in the AI-integrated education space—offering prospective students a future-ready academic environment aligned with India's national AI vision.

What makes this initiative particularly significant for prospective students and parents is that AI adoption at ASM is not limited to a single program or department. It spans across the entire academic ecosystem of the group.

Across ASM's diverse portfolio of programs in multiple institutes — including MBA, PGDM, MCA, Engineering, Undergraduate courses, and School & Junior College education—AI is being systematically integrated to future-proof every learner.

AUDYOGIK SHIKSHAN MANDAL
Since 1983
ASM
Education • Research • Consultancy

### The AI Fest marks the beginning of a sustained transformation roadmap supported by

- Institute-wise ASM AI Task Forces to drive long-term implementation
- Establishment of ASM AI Centre of Excellence (CoE) for advanced training and research
- Deployment of the in-house developed Navdrishti App — beginning with AI-enabled placement modules and expanding into academics and finance
- Launch of PGDM Dual Specialisation Program with AI integration

### AI Learning Across ASM Institutions

- MBA & PGDM – AI-driven business analytics, marketing automation, and financial modelling at IBMR, IPS & IIBR
- MCA & Engineering – Machine learning tools, AI coding assistants, and real-world AI projects at IBMR & Nextgen Technical Campus
- Undergraduates – AI for entrepreneurship, digital business, and data-driven decisions at CSIT
- School & Junior College – Foundational AI literacy and ethical awareness at GEMS, EMPROS International School, CSIT Junior College & GJC